...तर मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही - रविकांत तुपकर आक्रमक >> पान 2

खांद्याला खांदा लावून काम करतो तोच खरा पवार साहेबांचा मावळा >> पान 3

मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचवा - नरेंद्र अण्णासाहेब पाटील >> पान 4

**सुविचार**

आनंदी राहण्यासाठी छोट्या गोष्टींचा आनंद घ्या.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 270 ■ बुधवार, दि. 11 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




कतरिना कैफ मालदिवची 'ग्लोबल ब्रँड ॲम्बेसेडर'

आतील पान

# मद्यप्रेमींच्या खिशाला झळ!

## दारू महागली, राज्य सरकारचा मोठा निर्णय; मंत्रिमंडळाकडून उत्पादन शुल्कात वाढ

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : काही दिवसांपूर्वी देशात बिअर या मद्याचे दर कमी होणार असल्याचे वृत्त माध्यमांत झळकल्याने मद्यप्रेमींनी आनंद व्यक्त केला होता. मात्र, राज्य सरकारचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीकोनात उत्पादन शुल्क विभाग मद्यविक्रीवर कर वाढविण्याचा विचार करत होते. अखेर, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत दारु विक्रीवर आयएमएफएल (कर) वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



त्यामुळे, मद्यप्रेमींच्या खिशाला झळ बसणार असून त्यांचं दुःख आणि सेलिब्रेशनही महागणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे, मद्यावरील शुल्क वाढीमुळे राज्याच्या तिजोरीत १४,००० कोटींचा महसूल वाढणार आहे. मद्यपींना एका क्वार्टरसाठी म्हणजेच १८० मिली दारुसाठी ८० ते ३६० रुपये मोजावे लागतील. त्यामध्ये, देशी दारु ८० रुपयांना १८० मिली मिळणार आहे. तर, विदेशी प्रिमियम ब्रँड ३६० रुपये १८० मिली असेल.

राज्याच्या महसुलात वाढ करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने मद्यविक्रीवरील करत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर (आयएमएफएल) दिड टक्याने वाढविण्यात आला आहे. त्यासह, विदेशी मद्यावरही हा कर वाढविण्यात आल्याने आता मद्यप्रेमींसाठी हा निर्णय खिशाला झळ देणारा आहे.

कोणतं मद्य कितीला मिळणार?

१८० मिली मद्य किरकोळ विक्रीची किंमत

देशी मद्य– ८० रुपये

महाराष्ट्र मेड लिकर – १४८ रुपये

भारतीय बनावटीचे विदेशी मद्य – २०५ रुपये

विदेशी मद्याचे प्रमीयम ब्रॅण्ड– ३६० रुपये

उत्पादन शुल्क विभात १२२३ पद नव्याने भरणार >> पान २

# पेरण्यांची घाई नको, १५ जून नंतरच मोसमी पाऊस

## मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा, कृषी विभागाचं शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदीचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या खते पुरवठा याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 'राज्यातील सर्व भागात पंधरा जून मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पावसाची मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

मोसमी पाऊस तीन चार दिवसांत सक्रिय

मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची >> पान २

# ट्रक- बसच्या भीषण अपघात, तीन जण ठार

## सोलापूर अक्कलकोट महामार्गावरील घटना



**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर अक्कलकोट महामार्गावर झालेल्या ट्रक आणि बसचा भीषण अपघातात तीन जण ठार झाल्याची घटना घडली. प्राप्त माहितीनुसार वळसंग जवळील कर्जाळा येथील उभ्या असलेल्या ट्रकला बसने धडक दिली. भरधाव वेगाने ट्रॅव्हल्स बसने ट्रकला धडक दिल्यामुळे बसच्या डाव्या बाजुचे मोठे नुकसान झाले. पुण्यावरून अक्कलकोटकडे देवदर्शनला जात असताना झाला अपघात. पुण्यावरून अक्कलकोटकडे जाणाऱ्या बस मध्ये ३० ते ३५ भाविक असण्याचा प्राथमिक अंदाज आहे. अपघातात अनेक भाविक जखमी झाल्याचा प्राथमिक अंदाज, जखमींमध्ये लहान मुलांचाही समावेश आहे. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाकडून जखमींना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. जखमींना अक्कलकोट आणि सोलापुरातील सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## दादांची आठवण मला रोजच येत असते; सुप्रिया सुळे भावुक

**पुणे/प्रतिनिधी :** आज दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पक्षाचा वर्धापन दिन सोहळा पुण्यात साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकसंघ असताना प्रत्येक वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला पुढे असणारे अजित दादा पक्षफुटीनंतर गेल्या दोन वर्षापासून वेगळा वर्धापन दिन साजरा करीत आहेत. आज दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून वेगळा वर्धापन दिन साजरा होत आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांना अजितदादांची आज आठवण येते का? असं विचारलं असता त्या म्हणाल्या की दादांची म ला रोज आठवण येत असते. सगळ्या भावांची आठवण मला येते, मला सहा भाऊ असून, सगळ्यांशी रोज बोलणं होतं आणि सगळ्यांना मी शुभेच्छा देत असते, असंही यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या. >> पान २

# महाराष्ट्रातील वातावरणात बदल! पावसाचा जोर वाढणार

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील वातावरणात बदल होत आहे. काही भागात तुरळक पाऊस पडत आहे, तर काही ठिकाणी पावसाचा जोर कमी झाल्याचे दिसत आहे. दरम्यान, राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. भागत बदलत राज्यात पाऊस पडणार असल्याचे डख म्हणाले. राज्यात नेमका कुठं कुटं पाऊस पडणार याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात.

राज्यात १० ते ११ जूनच्या दरम्यान दक्षिण महाराष्ट्राकडे पाऊस पडणार आहे. पण सर्व राज्यात सांगायचं झालं तर ११ जूनपासून म्हणजे १२ ते १३ जूनच्या नंतर पाऊस वाढत जाणार असल्याची माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे. पूर्व विदर्भ, पश्र्चिम विदर्भाकडे ११ च्या नंतर १२ ते १३ जूनला पाऊस येणार आहे. दक्षिण महाराष्ट्राकडे १०, ११, १२ जून पासूनच पाऊस चांगल्या प्रमाणात पडणार असल्याचे पंजाबराव डख म्हणाले.

मराठवाड्यामध्ये आज तुरळक ठिकाणी पाऊस पडणार आहे. त्याच्यानंतर ११ जूनला मराठवाड्याकडे चांगला पाऊस वाढत जाणार आहे. मराठवाड्याकडे ११ जून पासून ते २० जून दरम्यान चांगला पाऊस पडणार आहे. दररोज भाग बदलत मराठवाड्यात पाऊस पडणार असल्याची माहिती पंजाबराव डख म्हणाले.

उत्तर महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याला सांगू इच्छितो की, १२ जून पासून ते २० जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात पाऊस पडणार आहे. पश्र्चिम महाराष्ट्रा १० जून पासून ते २० जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात भाग बदलत दररोजच पाऊस पडणार आहे. राज्यात १२ जून नंतर पावसाची व्याप्ती वाढत जाणार आहे. १३ ते २० जून दरम्यान राज्यात सगळीकडे भाग बदलत बदलत पाऊस पडणार आहे.

राज्यात १३ जून ते १८ जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात जोराचा पाऊस पडणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, संगमनेर, >> पान २

## जात प्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्र आता एका क्लिकवर मिळणार

**मुंबई/प्रतिनिधी :** जात प्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्जदारांना अनेक अडचणींचा साम ना करावा लागतो. त्यासाठी सरकारी कार्यालयात बऱ्याचदा फेऱ्या माराव्या लागतात. तरीदेखील कधीकधी काम होत नाही. मात्र आता नागरिकांसाठी एक आनंदाची बातमी समोर येत आहे. जातप्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्र आता एका क्लिकवर मिळणार आहे. ही सर्व प्रक्रिया जलद आणि सुलभ होण्यासाठी संगणकीय ऑनलाइन प्रणाली विकसित केली जाणार आहे. या प्रस्तावाला राज्य सरकारने तत्वत: मान्यता दिली असून येत्या महिन्याभरात ही प्रणाली कार्यन्वित होणार आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्ती जाती, भटक्या जमाती इतर म ागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग यांना सरकारी नोकऱ्या, शैक्षणिक प्रवेश, निवडणूक आरक्षण आणि इतर सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी >> पान २

# अधिकारी व कंत्राटदाराने लाटली मलाई?

## ➤ कोट्यावधीचा खर्च होऊनही कायम पाणी टंचाई

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर :** मेहकर तालुक्यात ९२ व लोणार तालुक्यात ६५ च्या वर गावात जलजीवन मिशन अंतर्गत दोन वर्षापासून कामे सुरू आहेत. सदर कामे हे कालावधी पूर्ण होणे अपेक्षित असताना संपूर्ण कामे ही अपूर्ण आहेत. त्यामुळे जनतेला पाण्यासाठी वनवन भटकंती करावी लागली आहे. कोट्यवधी रुपयांच्या या कामांमध्ये अधिकारी, पदाधिकारी व कंत्राटदाराने मलई लाटल्याने पाणीटंचाई कायम राहिली आहे. संपूर्ण उन्हाळा पाणीटंचाईत गेल्यानंतर आता पावसाळ्यातही शुद्ध पाणी मिळेल की, नाही याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जलजीवन मिशनची कामे सुरू आहेत. मात्र, बहुतांश कामे पूर्ण झाले नाहीत. बहुतांश कामांमध्ये गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी झालेल्या आहेत. कुठे पाण्याची टाकी पूर्ण तर, कुठे पाईप लाईनचे काम अपूर्ण व इतर कामे अपूर्ण, अनेक ठिकाणी विहीर खोदकाम अपूर्ण अशा अनेक कारणाने मेहकर लोणार तालुक्यातील जवळपास दीडशे च्यावर गावातील जलजीवन मिशनच्या योजनेचे काम रखडलेले आहेत.सदर कामे हे वेळेत पूर्ण करून घेण्याची जबाबदारी जल जीवन मिशनच्या अधिकाऱ्याची असताना जलजीवन मिशनच्या अधिकाऱ्यांनी केवळ बघायची भूमिका घेतल्याने जनतेला पाण्याच्या सुविधेपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. अधिकारी पदाधिकारी व कंत्राटदारांच्या निष्काळजी पणमुळे मेहकर –लोणार मतदारसंघातील तब्बल दीडशेच्या वर जलजीवन मिशनचे कामे हाती घेतल्यानंतरही ती पूर्णत्वास न गेल्याने मेहकर लोणार मतदारसंघातील जनतेला संपूर्ण उन्हाळा पाण्यासाठी भटकंती करत घालावा लागला. आता पावसाळ्यातही शुद्ध पाणी मिळेल की नाही याबाबत शंका उपस्थित केली जात आहे. अधिकारी पदाधिकाऱ्यांना रखडलेली कामे वेळेत पूर्ण करून घेण्यासाठी पाठपुरावा करून पूर्णत्वास नेली असती तर मतदार संघातील जनतेला उन्हाळ्याच्या दिवसात तरी शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा मिळाला असता मात्र, अधिकारी पदाधिकारी व कंत्राटदार यांच्या निष्काळजीपणामुळे जनतेला उन्हाळ्यात पाणीटंचाईसाठी पायपीट करावी लागली. आता पावसाळ्याचे दिवस लागल्याने पावसाळ्याच्या दिवसांमध्ये तरी शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा,अशी अपेक्षा मेहकर लोणार मतदार संघातील जनतेकडून होत असून याकडे अधिकाधिक पदाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देऊन जनतेची पाण्यासाठी होणारी हेळसांड थांबवावी, अशी मागणी जनतेकडून केली जात आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक



## साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

# ...तर मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही - रविकांत तुपकर आक्रमक

## ■ कर्जमुक्ती व पीकविम्यासाठी शेतकऱ्यांचा शेगावातून एल्गार..!

## ■ तुपकरांची बैलगाडीतून शेगावात मिरवणूक! शेतकऱ्यांनी केले जंगी स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**शेगाव/प्रतिनिधी :** सोयाबीन-कापसाला भाव नाही, कांद्याला भाव नाही, उसाचाही प्रश्न बिकट आहे., नुकसान भरपाई नाही, पेरणी तोंडावरील परंतु पीककर्ज नाही, कर्जमाफी नाही आज राज्यातील शेतकरी संकटात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एल्गार पुकारला आहे. सरकारने जर शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर येणाऱ्या काळात मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा गंभीर इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी संत नगरी शेगाव येथे बोलताना दिला. शेगाव येथील माहेश्वरी भवन येथे आयोजित एल्गार मेळाव्याला शेतकरी आणि तरुणांचा प्रचंड प्रतिसाद दिसून आला.

संत नगरी शेगाव येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात आज १० मे रोजी एल्गार मेळावा पार पडला. या मेळाव्यापूर्वी रविकांत तुपकर यांनी संत गजानन महाराज मंदिरात जाऊन श्रींचे दर्शन घेतले. यावर्षी पाऊस वेळेवर वेळेवर येऊ द्या, पिके चांगली राहू दे आणि शेतकऱ्यांच्या घरात चांगले उत्पन्न येऊ दे, या सोबतच सोयाबीन आणि कापसाला चांगले दर देण्याची सद्बुद्धी व शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्याची सद्बुद्धी या सरकारला दे अशी प्रार्थना रविकांत तुपकर यांनी संत गजानन महाराजांच्या चरणी केली.

पुढे बोलताना शेतकरी नेते रविकांत तुपकर म्हणाले की, मी गेल्या २२ वर्षापासून शेतकऱ्यांसाठी संघर्ष करीत आहे, त्याचेच फळ म्हणून या जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांनी मला लोकसभेत अडीच लाख मते दिली. एका अपक्ष उमेदवाराने अडीच लाख मते घ्यावी ही बुलढाण्याच्या इतिहासातील पहिलीच वेळ आहे. घाटाखालील मतदारांनी मला साथ दिली असती तर आज चित्र वेगळे असते. परंतु या भागातील लोकांना निकालानंतर पश्चाताप झाला. शेतकरी हीच माझी जात आहे आणि शेतकरी हाच माझा धर्म आहे. मी अजून केवळ शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठीच लढत आलो आणि यापुढेही शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठीच लढत राहील, याची ग्वाही गजाननाच्या साक्षीनं देतो असेही रविकांत तुपकर यावेळी म्हणाले. ज्यांना निवडून दिलं त्यांनी आजपर्यंत जिल्ह्यासाठी काहीच केलं नाही. आरोग्य मंत्री आहेत परंतु जिल्ह्यातील आरोग्याचा प्रश्न मोठा आहे. केस गळती, नख गळतीबाबत अजूनही संशोधन झालं नाही. ते केंद्रीय मंत्रीचं काय पंतप्रधान जरी झाले तरी या जिल्ह्याचा जे काही भलं करू शकत नाही असा टोला देखील यावेळी रविकांत तुपकर यांनी लगावला. ते म्हणतात मी मोदींच्या जवळ आहे जर ते मोदींच्या एवढे जवळ आहेत तर मग पिकविमा बद्दल, सोयाबीन कापूस भावाबद्दल शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बद्दल एक शब्द इथे का बोलत नाही असा सवालही यावेळी रविकांत तुपकर यांनी केला. पिकविम्याचा प्रश्न सुरुवातीपासूनच आपण लावून धरला. विविध आंदोलन केली त्यामुळेच २०२३ चा पाचशे कोटीचा आणि २०२४ चा साडेसहाशे कोटींचा पिक विमा आपल्या जिल्ह्याला मंजूर झाला. राज्यात सर्वाधिक पिक विमा आजपर्यंत बुलढाणा जिल्ह्यालाच मिळाला हे आपल्या आंदोलनाचे यश आहे हे देखील त्यांनी ठणकावून सांगितले. कर्जमाफी, पीकविमा आणि शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी मी गेल्या महिन्याभरापासून राज्यभर दौरे सुरू केले आहेत. नाशिक, निफाड, सिन्नर, संगमनेर, अहिल्यानगर, शिक्रापूर, शिरूर,कर्जत, जामखेड, पंढरपूर, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, नांदेड, परभणी, लातूर, बीड, नागपूर, अमरावती, आदि जिल्ह्यांमध्ये २७ मे रोजी सिंदखेडराजा येथे एल्गार मेळावा घेतला आणि त्यानंतर आज संत नगरीत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन तुमच्या सर्वांचे आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे असे देखील यावेळी तुपकर म्हणाले. निवडणुकीपूर्वी सरकारने कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते त्यामुळे शेतकऱ्यांनी कर्ज भरले नाही. मात्र आता सरकारने शब्द पाळला नाही त्यामुळे शेतकरी थकबाकीदार झाले आहेत दुसरीकडे बँकांनी वसुली साठी तगादा लावला आहे. बँका नव्याने कर्ज देत नाहीत. वास्तविक कर्जमुक्ती करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे आता सरकारने शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ केले पाहिजे. ज्यांना अद्यापही पीक विमा मिळाला नाही त्या शेतकऱ्यांना तातडीने पिक विमा मिळाला पाहिजे, सोयाबीनला कापसाला तीन हजार रुपये प्रति क्विंटल भाव फरक दिला पाहिजे,जंगली जानवरांमुळे पिकांचे ५०% नुकसान होते त्यामुळे जनावरांचा बंदोबस्त केला पाहिजे, शेतमजुरांना विमा संरक्षण दिले पाहिजे, जिगाव प्रकल्पग्रस्तांना वाढीव दराने मोबदला मिळाला पाहिजे यासाठी आपण आता लढा तीव्र करायचा आहे. ही वेळ सरकारची आरती करायची वेळ नसून हातात रूम्हणे घ्यायची वेळ आहे. राज्यभरातील शेतकरी आता एकत्रित येत असून आपल्याला मोठा संघर्ष करावा लागणार आहे. सरकारने वेळेच आपल्या मागण्या पूर्ण नाही केल्या तर येणाऱ्या काळात मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा ईशारा देखील यावेळी रविकांत तुपकर यांनी दिला. येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत त्यावेळी या सरकारला कर्जमाफीची जाणीव करून देणे आवश्यक आहे. जो कर्जमाफी की बात करेगा.. वही स्थानिक स्वराज्य संस्था मे राज करेगा, असा नारा आता गावोगावी देण्याची वेळ आली आहे. आपल्या न्याय हक्कासाठी मोठा संघर्ष करण्याची तयारी ठेवा असे आवाहन देखील यावे रविकांत तुपकर यांनी केले. यापूर्वी कार्यकर्त्यांनी रविकांत तूपकरांची सजवलेल्या बैलगाड्यातून जंगी मिरवणूक काढून त्यांचे स्वागत केले. या मेळावाला शेतकऱ्यांची गर्दी पहावयास मिळाली.

यावेळी ज्येष्ठ नेते वासूदेव उन्हाळे, आर. बी. देशमुख, राजू शेळके, संतोष खेर्डे, विलासराव पाटील, भवगन मोरे, गजानन देशमुख, सदाशिव जाधव, ज्ञानदेव कराळे, अमोल राऊत, अनंता मानकर, अक्षय पाटील, वैभव जाणे, मासूम शहा, आनंदा आटोळे, उमेशसिंग राजपुत, नाना खटके, प्रकाश पाटील, युनूस भाई, कु. वैष्णवी भारंबे, दीपक देशमुख, सचिन शिंगोटे, भागवत धोरण, अनंता शेळके, निलेश गवळी, वैभव माळी, सेख अस्लम, सुनील अस्वार, श्रीकृष्ण मसुरकर, भास्कर तांदळे, अवी बोरसे, नंदू गावंडे , सोपान खंडारे यांच्या सह हजारो शेतकरी उपस्थित होते.





### तुपकर झाले धुरकरी... बैलगाडीतून शेतकऱ्यांनी काढली मिरवणूक

एल्गार मेळाव्यासाठी शेगावात दाखल झालेल्या रविकांत तुपकरांची परिसरातील शेतकऱ्यांनी सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणुक कढत जंगी स्वागत केले. यावेळी शेगाव शहरातील अनेक व्यापारी स्वागतासाठी रस्त्यावर होते. रविकांत तुपकरांनी स्वतः बैलगाडी चालवत, धुरकरी होत बैलगाडीच्या रथाचे सारथ्य केले व बैलगाडी चालवतच ते सभाथळी पोहचले.

पान १ वरून...

### मद्यप्रेमींच्या खिशाला झळ!

सोबतच सीलबंद विदेशी मद्यविक्री हॉटेल आणि रेस्टॉरंट कराराद्वारे भाडेतत्त्वावरती चालविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यावर दहा ते पंधरा टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार आहे. उत्पादन शुल्क विभागाला बळकटी देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागात १२२३ पदं नव्याने भरले जाणार आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभाग अंतर्गत मुंबई शहर आणि उपनगर यासाठी नव्याने विभागीय कार्यालय सुरू करणार असल्याची माहितीही समोर आली आहे. तसेच, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर आणि अहिल्यानगर या ६ जिल्ह्यांसाठी नव्याने अधीक्षक कार्यालय सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली. उत्पादन आणि विक्रीसाठी विभागाच्या माध्यमातून एआय आधारित कंट्रोल रूम तयारी केली जाणार आहे.

दरम्यान, देशात विकली जाणारी ब्रिटिश बिअर ७५ टक्क्यांपर्यंत स्वस्त होणार असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी झळकले होते. भारत आणि ब्रिटनमधील एफटीए अंतर्गत आयात शुल्क कमी करण्याचा करार झाल्याने ही बिअर स्वस्त होणार होती. मात्र, आता राज्यात दारुचे दर वाढल्याचं सत्य मद्यपींना पचवावे लागेल.

### पेरण्यांची घाई नको,

शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात बारा जून रोजी मराठवाड्यातील काही भागात बारा ते चौदा जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे बारा आणि पंधरा जून दरम्यान मुसळधार तर १३ ,१४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात तेरा ते पंधरा जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाऊ नये. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये, वीजा होताना झाडांच्या खाली आसरा घेऊ नये, वीजेची आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे वीज पुरवठा खंडित करुन ठेवावीत, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या स्त्रोतातून तत्काळ बाहेर पडावे, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

धरणातील पाणीसाठा समाधानकारक

राज्यातील सर्व प्रमुख धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याचे आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगण्यात आले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी माहिती दिली.

धरणाचे नाव, सध्याचा पाणी साठा, गेल्या वर्षीचा साठा - गोसीखुर्द४.६४टीएमसी(८.६७),तोतलाडोह१८.७९(१८.१४), ऊर्ध्व वर्धा ८.८५ (८.८७), जायकवाडी २२.६०(२.९९), मांजरा १.६३(०.००), ऊर्ध्व तापी हातनूर ५.३२(२.६३), गंगापूर २.५०(२.४८), कोयना १७.३६(१०.००), खडकवासला०.८४(१.०३), उजनी १८.७२(०.००), भातसा ९.९५(८.१७), धामणी ३.११(१.७७).

### दादांची आठवण मला रोजच

सशक्त लोकशाहीत स्वतःचं मत मांडण्यात गैर काय? - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पुण्यात १० वाजून १० मिनिटांनी पक्ष कार्यालय येथे पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलंय. यावेळी खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. यावेळी त्यांना याबाबत विचारलं असता त्यांनी आपलं मत व्यक्त केलं. आपण जे स्टेट्स ठेवलं आहे, त्याबाबत सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, माझ्या आईने मला जो सल्ला दिला, तो मला काल विमानात बसल्यावर आठवला आणि तो मी ट्विट केला. सशक्त लोकशाहीत स्वतःचं मत मांडण्यात गैर काय आहे, असं यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या.

पुन्हा एकसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पाहायला मिळणार का? - आज दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने वेगवेगळे वर्धापन दिन साजरे केले जात आहेत, पुढच्या वर्षी पुन्हा एकसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पाहायला मिळणार का? असं यावेळी सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, तुमची जी अपेक्षा असेल ती मी माझ्या पक्षातील वरिष्ठांना कळवेन. तसेच गेल्या २६ वर्षात पक्षासाठी ज्यांनी ज्यांनी जे जे योगदान दिलं, त्या प्रत्येकाचं योगदान हे महत्त्वाचं आहे, असंही यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या.

मला घरच्यांशी बोलायलादेखील वेळ मिळाला नाही - गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहेत. आपल्याकडे साहेबांनी जबाबदारी दिली आहे, याबाबत सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, मी गेली १५ दिवस बाहेर होते. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत देशाच्या बाहेर होते. त्यामुळे मला घरच्यांशी बोलायलादेखील वेळ मिळाला नाही, असंही यावेळी सुप्रिया सुळेंनी सांगितलंय.

### महाराष्ट्रातील वातावरणात बदल!

नगर या जिल्ह्यात अति मुसळधार पाऊस पडणार आहे. १३ जून ते १८ जून च्या दरम्यान लातूर, नांदेड, बीड, धाराशीव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छ. संभाजीनगर, जालना, त्याच्यानंतर उत्तर महाराष्ट्रामध्ये धुळे, नंदुरबार, जळगाव, पारगुळा तसेच बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, हिंगोली, वाशिम, यवतमाळ सांगायचं झालं तर सर्व जिल्ह्यात खूप पाऊस पडणार आहे.

### जात प्रमाणपत्र आणि

जात प्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सध्याच्या प्रक्रियेत हे प्रमाणपत्र काढण्यासाठी खूप अडचणी येतात. तसंच, अनेक कागदपत्रांच्या पूर्ततेसाठीही अडचणी येतात.

राज्य सरकारने बार्टी म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि टाटा कन्सलटन्सी सर्विहसेस (टीसीएस) यांच्या संयुक्त विद्यमाने डिजीटल प्रणालीच्या माध्यमातून जातवैधता आणि जात प्रमाणपत्र काढण्याची प्रक्रीया सुलभ होणार आहे. या योजनेला सरकारने तत्वतः मंजुरी दिली आहे.

नेमके काय होणार?

- जातवैधता आणि जातप्रमाणपत्रांसाठी नागरिकांनी केलेल्या अर्जासाठी एआयचा वापर होणार आहे. यामध्ये डिजी लॉकरसारख्या प्लॅटफॉर्मसह एकत्रित काम केले जाणार आहे.
- अर्ज करणाऱ्या व्यक्तीचे नाव, पत्ता, मुळ पत्ता, वडिलांचे नाव, पतीचे नाव ही माहिती थेट आधारकार्डशी संलग्न करुन पडताळणी केली जाणार आहे.
- तसंच या प्रक्रीयेमुळं चुकीची नोंद किंवा अर्जातील कागदपत्राची त्रुटी लगेच दाखवली जाईल. त्यामुळं चूक लगेच दुरुस्त करता येईल.
- अर्ज करताना एकच अर्ज आणि एकच प्रक्रिया असेल त्याद्वारेच प्रमाणपत्र वितरित केले जाईल
- ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असेल. तसंच, यामुळं दलालांचे कामदेखील संपेल. त्यांच्याकडून होणारी संभाव्य फसवणूक टळेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### गाडीच्या डिक्कीत मिळाले ३० किलो चांदी



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** संतोष लढा यांच्या घरावर पडलेल्या दरोडा प्रकरणी पोलिसांना मोठे यश आलं आहे. एन्काऊंटर झालेल्या अमोल खोतकर यांच्या बहिणीने दिलेल्या माहितीनुसार अमोलने एका गाडीच्या डिक्कीत बॅगा ठेवल्या आहेत अशी माहिती दिली. पोलिसांनी गाडीचा शोध घेऊन बघितले असता गाडीच्या डिक्कीत बॅगांमध्ये ३० किलो चांदी आढळून आली आहे. वाहनासह चांदी पोलिसांनी जप्त केली आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी दिली.

### बीड जिल्ह्यात गत वर्षभरात ३०० हून अधिक बालविवाह



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** जिल्ह्यात गत वर्षभरात ३०० हून अधिक बालविवाह झाल्याचे समोर आल आहे. ज्यात २५८ बालविवाह रोखण्यास जिल्हा प्रशासनाला यश आले आहे. तर प्रशासनाने १८ जणांवर गुन्हे देखील दाखल केले आहेत. मुलीच्या सुरक्षेच्या दृष्टीने ग्रामीण भागात पालक चिंतेत असतात. त्यात ऊस तोडीसाठी कामगारांचे स्थलांतर होते. त्यामुळे त्यांच्या किशोरवयीन मुलीचा प्रश्न निर्माण होतो. अशातच बालविवाहाचा पर्याय पालकांकडून निवडला जातो. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात बालविवाहाचे सारखे प्रमाण आढळून आले आहे. जिल्ह्यात होणारे बालविवाह रोखण्यासाठी मागील काही वर्षांमध्ये प्रशासनाकडून जनजागृती केली जाते आहे. त्याच माध्यमातून हे बालविवाह रोखण्यास प्रशासनाला यश आले. मात्र, जिल्ह्यात बालविवाह रोखले जात असल्याने, इतर ठिकाणी जाऊन बालविवाह होत असल्याची चिंतेची बाब जिल्हा बाल प्रकल्प अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यात प्रामुख्याने ऊसतोड कामगार मुलांच्या बालविवाहाचा समावेश आहे.अशी माहिती जिल्हा समन्वयक बाल प्रकल्प अधिकारी अश्विनी जगताप यांनी दिली.

### गुगल मॅपची मदत करणं पडलं महागात, अपूर्ण बांधकाम झालेल्या उड्डाणपुलावर अडकली कार!

महाराजगंज (लखनौ) : गुगल मॅपचा वापर करून अनेकदा प्रवास करण्यात येतो. पण, गुगल मॅपनं चुकीची दिशा दाखविल्यानं कधी-कधी अपघातदेखील होतात. असा प्रकार उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्ह्यात घडला आहे.

सोमवारी रात्री उशिरा महाराजगंज जिल्ह्यात लखनौहून निघालेली कार जिल्ह्यातील भैया फरेंडा भागात बांधकाम सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या टोकावर अडकली. वेळीच वाहनचालकानं काळजी घेतल्यानं मोठा अपघात टळला. ही घटना भारत-नेपाळला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-२४ (गोरखपूर-सोनौली रोड) वर घडली. या ठिकाणी उड्डाणपुलाचं बांधकाम सुरू असताना कार अडकली आहे.

उड्डाणपुल लांबून उड्डाणपुलासारखा दिसतो- स्थानिक लोकांच्या माहितीनुसार उड्डाणपुलाचा एक भाग पूर्णपणे बांधण्यात आला आहे. त्यावर पिचिंगदेखील करण्यात आलं आहे. त्यामुळे दुरून जाणाऱ्या लोकांना हा उड्डाणपुल सामान्य रस्त्यासारखा दिसतो. उड्डाणपुलाची दुसरी बाजू अद्याप अपूर्ण आहे. तिथे माती भरण्याचं काम सुरू आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या अंधारात जाणाऱ्या वाहनचालकांना माहिती देणारा कोणताही फलक लावलेला नाही. त्यामुळे वाहनचालकांना उड्डाणपूल अपूर्ण असल्याचा अंदाज येऊ शकत नाही. अचानक समोर खड्डा दिसल्यानं चालकानं ब्रेक लावला. परंतु तोपर्यंत गाडी पुढे सरकली होती. त्यानंतर गाडी थेट उड्डाणपुलाच्या टोकावर अडकली.

गुगल मॅपच्या चुकीनं रेल्वेवर अडकली होती गाडी- यापूर्वी झाशी जिल्ह्यातील तरुण गुगल मॅपमुळे दिशाभूल होऊन थेट रेल्वे ट्रॅकवर पोहोचले होते. गाडी बाजूला काढत असताना ती ट्रॅकच्या बाजूला असलेल्या खडीमध्ये अडकली होती. अचानक रेल्वे ट्रॅकवरून वेगाने बुंदेलखंड एक्सप्रेस आल्यानंतर वाहनचालकानं गाडी सोडून पळ काढला होता. रेल्वे चालकानं अचानक इमर्जन्सी ब्रेक लावून अपघात टाळण्याचा प्रयत्न केला.

# खांद्याला खांदा लावून काम करतो तोच खरा पवार साहेबांचा मावळा

## खासदार निलेश लंके यांचे प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** १२ नंतर सुद्धा कुणीतरी कार्यकर्ते सांभाळले पाहिजे, कोणी सांभाळतं १२ नंतर जो सांभाळतो. तोच खरा शरद पवारांचा मावळा आहे. वर्धापन दिनाच्या निमित्ताने आपल्या लोकसभेची निवडणूक झाली. विधानसभेची निवडणूक झाली. आणि त्या निवडणुकीमध्ये क्षणात काही गोष्टी राजकारणामध्ये बदल आपल्याला पाहायला मिळाले. अनेकांनी तर कविता काढले, मी तर प्रत्येकाला सांगू इच्छितो जो खऱ्या अर्थाने संघर्षामध्ये अडचणीच्या काळात पक्षाची साथ देऊ शकतो. आणि पवार साहेबांच्या खांद्याला खांदा लावून काम करू शकतो. तोच खऱ्या अर्थाने पवार साहेबांचा मावळा आहे.असे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले.

यावेळी ते म्हणाले की, अनेक जण म्हणतात आता कस व्हायचे काय व्हायचंय मी सांगतो. काय नाही उठल्यानंतर संघर्ष करायची तयारी ठेवायची, दिवसभर लोकात राहायचं. अरे शेवट बरेच जण म्हणतात तर काम करायचे जे करायचं ते करायचे. काम करण्यापेक्षा लोकांच्या सुखदुःखाचा लोकांच्या अडचणीचा लोकांच्या संघर्षात आमच्या लोकांच्या पाठीशी शिवबा राजांचा तुमच्या पाठिशी उभा राहिल्याशिवाय राहणार नाही. संकटात सुद्धा संधी पाहिली पाहिजे. आणि आपण ज्या दैवताच्या सहवासामध्ये काम करतो, ते पवार साहेब शंभर वर्षाचे व्हिजन असणारा नेता पवार साहेब एवढा व्हिजन असणारा नेता आपल्या सहवासात, आपण त्यांच्या सहवासात राहतो. हे खऱ्या अर्थाने तुम्ही आम्ही भाग्यवान आहोत. फक्त या समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे, शंभर वर्षांनी काय बदल अपेक्षित हा बदल घडवण्याचे काम करणारे आपले पवार साहेबांनी त्यांच्या नेतृत्वाखाली आपण सर्वजण काम करतो. संघर्ष राजकारणामध्ये वेळ काळ बदलत असतील.

आपल्या खेड्यात सांगतात ना चार दिवस सासुचे आणि चार दिवस सुनेचे कोणतेही पात्र, आले तरी ते यशस्वी पार पाडायची जबाबदारी आपण ठेवायची. तोच खऱ्या अर्थाने छत्रपती शिवरायांचा मावळा आणि आदरणीय पवार साहेबांचा मावळा आहे. ज्या महाराष्ट्रामध्ये आपण जन्माला आलो, ती साधू संतांची



भूमी आहे. माऊली, तुकोबांना त्रास दिला. छत्रपती शिवरायांना त्रास दिला. पण त्यांनी संघर्षामध्ये खऱ्या अर्थाने संघर्ष स्वागत म्हणून त्यांच्या जयंती पुण्यतिथी साजरी होते. आज आपण आदरणीय पवार साहेबांचे नेतृत्वाखाली काम करतो. सत्ता येते किंवा सत्ता जाते. काय पाहिजे पवार साहेबांच्या सहवासात राहण्यासाठी कित्येक लोकांचा जीव तळमळतो. आणि आपण त्यांच्या आजूबाजूला फिरतोय किती मोठा भाग आहे.

आपल्या सगळ्यात महत्त्वाचे माझ्यासारखा माणूस कधी आमदार होईल, स्वप्नात बघितलं नाही. ते आदरणीय पवार साहेबांमुळे आमदार झालो. मी आमदार झाल्यावर मी मला चिमटा घेऊन बघितला खरंच आमदार झालो का? आमदार खासदार झाला. आमचा तात्यांना विचारा तात्या म्हणले खर आहे, तू खासदार झाला ही ताकद आदरणीय पवार साहेबांची आहे. राजकारणामध्ये बरेच लोक आता कसे काय होत नसतं कधी दिवस बदलत्या भरोसा नाही. आशावादी राहायचं शिका. अरे जो घरात घुसतो तो कसला कार्यकर्ता तू कसला मावळा, आयुष्याच्या ५५ वर्षाच्या राजकारणामध्ये २५ वर्षे विरोधी बाकावर बसून, कारकीर्द पार पाडणारा आपला नेता आहे.

वधानसभेची निवडणूक झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी करायला त्या ठिकाणी भेट देण्याचं काम केले. पवार साहेब घरात बसले नाही. एखाद्या वीस वर्षाचा, पंचवीस वर्षाला तरुणाला लाजवणारा आपला नेता पवार साहेब एवढे धावपळ करणारा माणूस पाचशे पाचशे हजार किलोमीटर नॉनस्टॉप फिरणारा माणूस आहे. मी सांगतो आम्हाला हातही जोडता येतात. आणि भाया वर करता येतात. भायाच वर कराव्या लागतात सत्ता नसल्यावर माझे रोज वाद होतात. तुझं स्वतःसाठी जगतो आणि भायावर करतो. तो पवार साहेबांचा कार्यास करताच नाही.

साहेबांना माझ्या काही गोष्टी पटत नाहीत, पण आपल्या हाताने करतो आम्ही. धीर धरा, काहींना खूप घाई झाली आहे ना. आपले वय नाही, तेवढे या नेत्याचा अनुभव आहे. या नेत्याला राजकारणातले सगळे फायदे तोटे गणित जुळवता येतात. आपण हाफ चड्डीत होतो, तेव्हा देश नेता देशाचं राजकारण करत होता. सगळ्यांचा विचार करणारा नेता आहे. स्वतःसाठी जगला नाही. एखाद्या नेत्याला रात्री अपरात्री अडचण आली तर पवारसाहेब फोन करतात. साहेबांचा दम तुम्हाला माहित नाही, ज्याची त्याची स्टाईल असते. तुला समजत का नाही, तर उलटापाटा करून टाकतो ही आपली स्टाईल आहे. माझ्यासमोर पवार साहेबांनी एकाला सांगितलं होतं, निलेश लंके हा माझा कार्यकर्ता आहे. लोक वर्गणीतून निवडणूक लढवतो आहे. त्याच्या तो कार्यकर्ता आहे. साहेब हसले का आणि गप्प का हे कोणाला समजलं नाही, म्हणून ५५ वर्ष राजकारणात टिकून राहिलेत. असे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले.

# मला प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करा

## वर्धापन दिनी जयंत पाटील यांची मागणी!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मला प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करा अशी मोठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री जयंत पाटील यांनी पक्षाच्या वर्धापन दिनीच केली आहे. एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चा सुरु असताना, दोन्ही राष्ट्रवादीचे वेगवेगळे वर्धापन दिन सोहळे होत आहेत. अशातच आता जयंत पाटील यांनी थेट प्रदेशाध्यक्षपद सोडण्याची मागणी शरद पवारांकडे केल्याने, राजकीय वर्तुळात नव्या चर्चा सुरु झाल्या आहेत.

'मला पवार साहेबांनी बरीच संधी दिली. सात वर्षाचा कालावधी दिला. शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे. तुम्हा सर्वांदेखत साहेबांना विनंती करेन, शेवटी पक्ष पवार साहेबांचा आहे. पवार साहेबांनी यावर योग्य निर्णय घ्यावा. आपल्याला बरेच पुढे जायचे आहे.

हा पक्ष स्थापन झाला त्यावेळी शिवाजी पार्कमध्ये लाखोंचा जनसमुदाय पवार साहेबांची भूमिका ऐकण्यासाठी एकत्रित आले. १९९९ पासून २०१४ पर्यत सतत पवार साहेबांचा राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत राहिला. या राज्याच्या जडणघडणीतले अनेक निर्णय सत्तेत असताना या पक्षातल्या सगळ्या धोरणांना घेण्याचं काम केलं. या १४ वर्षाच्या कालखंडात १५ वर्षाच्या कालखंडात पक्षही अतिशय सामर्थ्याने वाढवण्याचे काम झालं. पण १४ साल उजाडले भाजपची सत्ता आली आणि बरीच लोकं आमच्या रेल्वेतून उतरून दुसऱ्या रेल्वेत जाऊन बसायला लागेल. पण आपण सगळे पवार साहेबांच्या मागे निष्ठेने राहीलो. तुमचं कौतुक मला यासाठीच आहे की अनुकूल असो प्रतिकूल असो, यश मिळो अथवा न मिळो तुम्ही सगळ्यांनी पवार साहेबांना आयुष्यभर



साथ दिली आणि म्हणून संख्ये पेक्षा गुणवत्तेला महत्व असतं.

सुप्रिया ताईंनी सिंदूर आ?परेशन बद्दल भुमिका मांडली. त्यांचं अभिनंदन. आपले पक्षीय मदभेद असतील मात्र परराष्ट्र धोरणाचा प्रश्न येतो तेव्हा या देशाच्या संरक्षणाची भूमिका पुढे मांडावी लागते. त्या ठिकाणी आपल्या पक्षाने आणि आदरणीय पवार साहेबांनी आम्हा सगळ्यांना सांगितलेले आहे की देश हिताची भूमिका ही सर्वप्रथम घेतली पाहिजे. शत्रूला धडा शिकवण्याची वेळ येते त्यावेळी देश एकसंघ असला पाहिजे आणि म्हणून तेव्हा तेव्हा आम्ही या देशाच्या कायम बरोबर राहण्याचं काम पवार साहेबांनी त्यांच्या आयुष्यात केलं. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत आपल्याला प्रचंड यश मिळालं. देशाचे मानकरी बहुतेक सगळे खासदार आज व्यासपीठावर आहेत. आपल्या सगळ्यांनी मेहनत घेतली आणि हा निकाल लागला.

डॉक्टर अमोल कोल्हे बसलेले आहेत त्यांनी फुटीनंतर पॉडकास्ट सिरीज सुरू केली. अमोल कोल्हे यांच्या सोबतचा पॉडकास्ट होता सुप्रियाताई, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, मी असेल आम्ही सगळ्यांची मुलाखत अमोल यांनी त्यावेळी अतिशय परखडपणाने घेतली आणि आमच्या पक्षाची फुट झाल्यानंतरची आमची भूमिका पोहचवण्याचं काम झालं.

२०१९ ला लोकसभेच्या वेळी चार खासदार निवडून आले. बारामती, सातारा, रायगड आणि शिरूर पुन्हा आम्ही सगळे विधानसभेच्या कामाला लागलो. विधानसभेच्या कामाला लागल्यावर एक दिवस पवार साहेबांना नोटीस दिल्यावर पवार साहेब म्हटले मला काय बोलवता मीच येतो ना तुमच्याकडे. ईडीने नोटीस दिली तेव्हा पोलिस घरी येवून सांगायला लागले येवू नका.

ही लढाई तुकाराम विरुद्ध नथुराम अशी आहे. आपण तुकारामांच्या बाजूचे आहोत. भाजपचे आधी दोनच खासदार होते. आज तो देशातील मोठा पक्ष आहे. त्यामुळे आपण सगळ्यांनी एकत्र काम करत रहायचंय . राज्याचं नेतृत्व आपण करु.

आम्ही पदाधिकारी यांना निमंत्रण दिलं. कार्यकर्ते नाराज झाले. फोन आले. पावसाळ्याच्या कार्यक्रमाला सगळ्यांना बोलवून त्यांची अडचण नको म्हणून बोलवलं नाही. प्रशांतने वेळ घेतली म्हणून पुण्यात कार्यक्रम. चांगलं त्याचं कौतुक. त्रुटींची जबाबदारी माझी.

आता शिवभोजन थाळी बंद झाली आहे. अनाथांचे पैसे वळवण्याचं काम सरकारकडून होतंय. दोन कोटी रुपये एका पीएकडे सर्किट हाऊसला सापडले. जाहिर फक्त २ कोटी झाले. तीन वर्षे प्रशासकाकडून महापालिका चालवल्या जात आहेत. मला शंका आहे जळगावला निवडणूक होणार नाही.

पवार साहेबांना शिव्या घालायच्या, मग मूळ प्रश्न बाजूला राहतो... आता विनाकारण टीका पवार साहेबांवर चालू आहे. ओबीसींचं संरक्षण करण्याचं काम पवार साहेबांनी केलं आजही त्यांची हीच भूमिका आहे.

आव्हाड जी... अभी भी पवार साहब का डर है. न्यायाधिशाकडे पैसे सापडले काहीच कारवाई नाही.

### अमेरिकेत भारतीय विद्यार्थ्याला वाईट वागणूक

नवी दिल्ली : अमेरिकेत सरकार विरोधी आंदोलनात सहभागी झालेले अथवा या आंदोलनांना सोशल मीडिया आणि इतर माध्यमांतून पाठिंबा देणारे परदेशी विद्यार्थी यांच्या विरोधात ट्रम्प प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. तसेच शेजारी देशांतून अमेरिकेत येऊन योग्य कागदपत्रांशिवाय अथवा व्हिसाची मुदत संपूनही मुक्काम करत असलेल्या परदेशी नागरिकांच्या हकालपट्टीची मोहीम अमेरिकेने हाती घेतली आहे. अमेरिकेच्या या दोन्ही मोहिमांबाबत ट्रम्प यांच्या विरोधकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या नाराजीकडे दुर्लक्ष करत ट्रम्प प्रशानाने कठोर पवित्रा स्वीकारला आहे. ताजी घटना न्यू जर्सीतील नेवार्क विमानतळावरील आहे. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. घटनेबाबत सविस्तर माहिती हाती आलेली नाही. पण व्हिडीओ बघून अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

नेवार्क विमानतळावर एका भारतीय विद्यार्थ्याचे हात हातकडीने बांधले आहेत. या विद्यार्थ्याला जमिनीवर जबरदस्तीने झोपवण्यात आले. त्याची कसून अंगझडती घेण्यात आली. एकाचवेळी चार पोलिसांनी त्याच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

स्वप्न पूर्ण करण्यासाठी अमेरिकेत आलेला तरुण विद्यार्थी पोलिसांच्या गराड्यात नेवार्क विमानतळावर होता. विद्यार्थ्याचे हात हाकड्यांमध्ये होते. पोलिसांच्या सूचनांचे तो तरुण विद्यार्थी रडत पालन करत होता. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होताच भारताच्या अमेरिकेतील वाणिज्य दूतावासाने चौकशी करुन योग्य ती कारवाई करू असे जाहीर केले आहे.

# ओबीसी समाज पण मोठा आहे, त्यांना पण प्रतिनिधित्व मिळाला पाहिजे


## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात काही वेगळे केले अशातला भाग नाही. काही त्यांच्यामध्ये दर वाढवले आहेत.शेवटी कोणताही राजकीय पक्ष असेल, वेगवेगळे पद मिळवून देण्याकरिता या निवडणूक महत्वाच्या असतात. सहकार संस्थात संधी देता येते.या निवडणुका काही कारणाने पुढे ढकलल्या होत्या. ओबीसींना राजकीय आरक्षण नव्हते. शेवटी ओबीसी समाज पण मोठा आहे, त्यांना पण प्रतिनिधित्व मिळाला पाहिजे.असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. ते म्हणाले की, पैसे थकलेले नव्हते, विरोधक चर्चा करत होते. मागच्या काही सरकारने वीज माफी दिली, आणि नंतर मागे घेतली. आता सध्या ५ लाख सोलर पंप महाराष्ट्रात दिले आहेत. आता महावितरणलं पॉज़ द्यावे लागतात, ती द्यावे लागणार नाही, सोलर वर वीज निर्मिती झाली पाहिजे.काही शासकीय कार्यालयावर पण सोलर पॅनेल ला मान्यता दिली आहे. या संदर्भातमध्ये ते काय बोलले, मला माहिती नाही. त्यांनी त्यांच काय मत मांडव. हा त्यांचा अधिकार आहे. त्यांना योग्य वाटेल, ते बोलू शकतात.

त्यांच्या संघटनेचा अंतर्गत प्रश्न आहे. हाके अशा विकृतीवर कशाला बोलतात. महायुती सरकारचे घटक म्हणून काम करतो.कार्यकर्त्यांची वेगवेगळी मत असू शकतात.काही हौशे नवशे असतात, ते काही उत्साहाच्या भरात बोलतात. जे काही बोलतात त्यांना काय अधिकार आहे. मी मानसिकता तयार केली पाहिजे ना कितीचा ही प्रभाग झाला तरी तयारी पाहिजे, आम्ही आमदारकी खासदारही एकत्र लढायचो. मात्र, काही जिल्ह्यात आघाडी घ्यायची काही ठिकाणी व्हायची नाही. कोणताही पक्ष प्रवेश देत असताना इलेक्टिव मेरिट पहिला जात आहे.

अनेक कार्यकर्ते यातून तयार होत असतात. कार्यकर्त्यांना पुढे घेऊन जायचं आमच नियोजन अ ा ह े . म ु ख य म ं त्री ठ ह ा व े सगळ्यांना वाटत वाटण काही चुकीच नसते.मात्र, आकडा महत्वाचा असतो. कधी कधी उत्साह मिळण्याकरिता अशी वक्तव्य केली जातात. मुंबईत आम्ही स्थापनेपासून कधी १४ च्या वर गेलो नाही. काही प्रमाणात आम्हाला अजमावव लागेल. उद्याच्या पक्षाला सर्वदूर



पोहोचवायच असेल, तर जागा तर लढवल्या लागणार आहेत.प्रत्येक पक्षात प्रमुख लोक निर्णय घेतात. कोणी पुस्तक काढल ? माहिती ही नसत. ज्या ज्या वेळी संकट येतात, तेव्हा नेतृत्व करणाऱ्याच्या पाठीशी उभ राहायच असते. हे देशाने दाखवून दिले आहे. ज्या ज्या वेळी घटना घडल्या देश एकसंघ सैन्य दलाच्या पाठीशी होता.असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### नमो शेतकरी महासन्मान निधी योजना; ई-केवायसी व आधार सीडिंग बँक खात्यांशी संलग्न करा - कृषी विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता जुलै २०२५ मध्ये वितरीत केला जाणार आहे. परंतु जिल्ह्यातील ३ हजार ४९२ शेतकऱ्यांची ई-केवायसी आणि ४ हजार ५९९ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग (DBT Enable) अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना सन्मान निधीपासून वंचित राहू शकतो. तरी शेतकऱ्यांनी ई-केवायसी आणि आधार सीडिंग बँक खात्यांशी संलग्न करुन घ्यावे, असे आवाहन कृषि विभागाकडून केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र शासनाकडून वार्षिक सहा हजार रुपये आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई- केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक असून बँक खात्याशी किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँकमध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करण्याचे काम तत्काळ पूर्ण करून घ्यावे. यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक, गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे बुलढाणा यांनी केले आहे.

### उबाठा शिवसेनेची वीज वितरण कार्यालयासमोर निदर्शने




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांचे वीज बिल माफ झालेच पाहिजे, या प्रमुख मागणीसह अन्य शेतीहिताच्या मागण्या, तसेच निवडणुकी दरम्यान भाजपा ने दिलेले वीज माफीचे आश्वासन पाळले नाही व पावसाळ्या पूर्वी सर्व दुरुस्तीची काम पूर्ण करावी या मागण्यांसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने बुलढाणा वीज वितरण कार्याल्यासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी असंख्य शेतकरी व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते, तसेच यावेळी प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. जर् मागण्या मंजूर झाल्या नाही तर उग्र आंदोलन करू असा इशारा जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत यांनी दिला आहे.

### कतरिना कैफ मालदिवची 'ग्लोबल ब्रँड ॲम्बेसेडर'

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफने आजवर तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. याशिवाय तिच्या नृत्याचेही अनेक चाहते आहेत. अभिनेत्री सोशल मीडियावर तिचे अनेक फोटो-व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहत असते. आपल्या अभिनय, डान्स आणि सौंदर्याने चर्चेत राहणारी कतरिना नुकतीच एका विशेष कारणामुळे चर्चेत आली आहे आणि हे कारण म्हणजे ती मालदिवची 'ग्लोबल ब्रँड ॲम्बेसेडर' झाली आहे.

मालदीवने पर्यटनाचे आकर्षण वाढवण्याच्या उद्देशाने अभिनेत्री कतरिना कैफला त्यांची नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले आहे. मालदीव मार्केटिंग अँड पब्लिक रिलेशन्स कॉर्पोरेशन (एमएमपीआरसी) ने मंगळवारी याबद्दलची घोषणा केली. विशेष म्हणजे ही घोषणा पंतप्रधान मोदींच्या भेटीपूर्वी करण्यात आली आहे. यावेळी एमएमपीआरसीने कतरिना मालदीवची ब्रँड ॲम्बेसेडर असणं ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट असल्याची भावना व्यक्त केली.

`याविषयी एमएमपीआरसीचे व्यवस्थापकीय संचालक थोयिब मोहम्मद म्हणाले, कतरिना कैफ आमची जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून असणे आमच्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. जागतिक मनोरंजन उद्योगातील तिची प्रसिद्धी आणि लोकप्रियता आम्हाला जगभरातून, विशेषतः भारतातून अधिकाधिक पर्यटकांना आकर्षित करण्यास निश्चितच मदत करेल. यानंतर अभिनेत्रीने तिच्या ब्रँड ॲम्बेसेडर झाल्याबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी कतरिना कैफ आनंदाने तिच्या भावना व्यक्त करत म्हणाली, मालदीव हे नैसर्गिक सौंदर्याचे प्रतिनिधित्व करते. हे एक असे ठिकाण आहे जिथे सुंदरतेसह शांतता मिळते. सनी साईड ऑफ लाईफचा चेहरा म्हणून माझी निवड झाल्याबद्दल मला अभिमान आहे. जगभरातील लोकांना मालदीव या निसर्गरम्य ठिकाणाचे आकर्षण आणि जागतिक दर्जाच्या ऑफर शोधण्यासाठी मदत करण्यास मी उत्सुक आहे. कतरिना केवळ अभिनेत्रीच नाही तर एक यशस्वी उद्योजिकादेखील आहे. तिने अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत आणि याबद्दल तिला पुरस्कारही मिळवले आहेत. तिचं हे प्रभावी व्यक्तिमत्व लक्षात घेता मालदीवने तिला ग्लोबल ब्रँड ॲम्बेसेडर बनवण्याचा निर्णय घेतला.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष यांनी घेतला आढावा

# मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचवा - नरेंद्र अण्णासाहेब पाटील







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी महामंडळाच्या योजना व कामकाजाचा आढावा घेतला. महामंडळाच्या योजनांचा लाभ मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील हे दोन दिवशीय शेगांव जि. बुलढाणा दौऱ्यावर आले होते. दौऱ्यादरम्यान अमरावती विभागाची जिल्हा निहाय आढावा बैठक शेगांव विश्रामगृह येथे पार पडली. यावेळी छत्रपती संभाजी नगर विभागीय समन्वयक प्रवीण आघवन, अमरावती विभाग अमेय परब, छत्रपती संभाजी नगर जिल्हा समन्वयक शुभम खरात, बुलढाणाचे पुरुषोत्तम अंभोरे वैभव मुंढे, सुरज जगताप तसेच अमरावती विभागातील सर्व जिल्हा समन्वयक व अखिल भारतीय मराठा महासंघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्रजी पाटील म्हणाले की, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील एक लाख मराठा युवकांना उद्योजक करण्याचे उद्दिष्ट पूर्ण झालेले असून येणाऱ्या काळात लाखो मराठा युवकांना स्वयंरोजगार मिळवून आत्मनिर्भर बनविण्याचा महामंडळ व राज्य शासन कटिबद्ध आहे. जिल्हा स्तरावरील अधिकारी, बँकर्स यांच्या सोबत बैठका घेऊन मराठा समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल. तसेच प्रत्येक तालुका निहाय मराठा समाजाची वर्गवारी करणे, बँक प्रलंबित कर्ज प्रकरणे निकाली काढणे, नवीन जास्तीत जास्त उद्योजक तयार करण्याच्या सूचना जिल्हा समन्वयक यांना दिल्या. मराठा समाजातील युवकांनी, नेत्यांनी, पदाधिकारी पुढाकार घेऊन विभागातील सर्व तालुक्यात महामंडळाच्या योजनाचा प्रचार व प्रसार करावा व गरजूना लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## खामगावात लाखोंचा गुटखा पकडला ; शिवाजीनगर पोलिसांची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**खामगाव :** खामगाव येथील शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा पोलिसांनी पकडला आहे. शहरातील अब्दुल हमीद चौकात एका बोलेरो पिकअप मधून हा गुटखा आला होता. वेळीच पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्याने पोलिसांनी त्वरित त्या ठिकाणी जाऊन गुटख्यासह सदर बोलेरो वाहन जप्त केले आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर गुटखा तस्करी होत असून परराज्यातून तसेच इतर जिल्ह्यांमधून शहरात गुटखा आणला जातो. दरम्यान बोलेरो पिकअप वाहन मधून येथील अब्दुल हमीद चौकात मोठ्या प्रमाणावर गुटखा आल्याची गुप्त माहिती शहर पोलिसांना मिळाली. या आधारे पोलिसांनी त्वरित त्या ठिकाणी छापा टाकला असता एक बोलेरो पिकअप क्र.एम.एच २८ बी.बी-२०६९ दिसली. पोलिसांना पाहून सदर वाहनाचा चालक पसार झाला. पोलिसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता त्यात प्रतिबंधित गुटखा दिसून आला.यावेळी पोलिसांनी बोलेरो वाहन व गुटखा असा एकुण २६ लाख २८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.


### लग्नाचं आमिष दाखवून २० वर्षीय तरुणीवर अत्याचार, पोट दुखू लागल्यानं धक्कादायक प्रकार समोर, बीडचं माजलगाव हादरलं

**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या माजलगाव येथे लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अनेकदा अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.पोट दुखू लागल्याने सदरील तरुणीची तपासणी केल्यानंतर पीडिता गर्भवती राहिल्याचे समोर आले.. ही घटना मे महिन्यात उघडकीस आली असून आता याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या वीस वर्षीय तरुणीची सुनील अलजेंडे याच्याशी मैत्री झाली.त्यानंतर पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वेळोवेळी अत्याचार केले. पोट दुखत असल्याने तिला आई-वडिलांनी रुग्णालयात नेले असता की पाच महिन्याची गर्भवती असल्याचे उघड झाल्यानंतर सुनील अलझेंडे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## भंडाऱ्यात सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह पावसाची जोरदार हजेरी, वृक्ष उन्मळून पडल्यानं वाहतुकीचा खोळंबा

दैनिक आपला विदर्भ





**भंडारा/प्रतिनिधी :** भंडारा जिल्ह्यात ताशी ४० ते ५० किमी वेगानं आलेल्या सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह पावसानं जोरदार हजेरी लावली. या वादळी वाऱ्यानं भंडारा ते लाखनी दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावरील एमआयडीसी लगत मोठे वृक्ष महामार्गावर उन्मळून पडल्यानं महामार्गावरील वाहतूक खोळंबली. महामार्गावर वृक्ष उन्मळून पडल्यानं एका लेनवरील वाहतूक बंद करून दुसऱ्या लेनवरून ती वळविण्यात आली. दिवसभर प्रचंड उकाडा होता. अशा स्थितीत घराबाहेर पडलेल्या नागरिकांची मात्र अचानक आलेल्या या वादळी वाऱ्यासह पावसात चांगलीच तारांबळ उडाली. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात पावसाने हजेरी लावली. कुठे जोरदार, कुठे हलक्या तर, कुठे मध्यम स्वरूपाच्या सरी बसत बरसल्यात. कापणीला आलेल्या भात पिकाचं या पावसामुळं नुकसान होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे पावसाच्या जोरदार सरी बरसल्याने वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांना काहीसा दिलासा मिळालाय.

### नागपूरमध्ये खळबळ! प्रेयसीचा मृतदेह सरणावर असताना प्रियकराने केले भयंकर कृत्य, नागरिकांनी चोपले



**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. नागपूर जिल्ह्याच्या कन्हान येथील १९ वर्षीय तरुणीने गळफास घेत आत्महत्या केली. ८ जून रोजी अंकिताने आत्महत्या केली. त्यानंतर शवविच्छेदनानंतर अंकितावर अत्यंसंस्कार सुरू होता. अत्यंसंस्कार सुरू असतानाच तिच्या प्रियकराने तिच्या सरणावर जाऊन उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. अनुराग मेश्राम असं या तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंकिताचे अत्यंसंस्कार सुरू असताना अनुरागने अचानक तिच्या सरणावर उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. तेव्हा अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नागरिकांनी अनुराग मेश्रामला चांगलाच चोपला. अनुराग सध्या कामठी परिसरात एका खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

नेमकं प्रकरण काय?

अंकिता आणि अनुराग हे एकाच गावातील असून त्या दोघांमध्ये मैत्री होती. या मैत्रीच्या वाटेत पुढे अडसर असल्याने अंकिताने राहत्या घरी रविवारी गळफास घेत आत्महत्या केली. यामध्ये अंकिताने लिहून ठेवलेल्या चिठ्ठी मध्ये माझ्या मृत्यूसाठी अनुराग मेश्रामला जबाबदार धरू नये आणि अनुरागला काहीही करू नये, असा उल्लेख केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे

अंकिताचे शवविच्छेदन पार पडल्यानंतर दुपारी चार वाजताच्या सुमारास अंत्यसंस्काराची तयारी सुरू होती. तिच्यावर अंत्यविधी पार पाडत असताना अचानक अनुराग मेश्राम हा तिथे पोहोचला. त्याने सरणावर उडी घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्नात होता. घटनेच्या माहितीनंतर अनुरागच्या वडील आणि भावांनी त्याला लगतच्या रुग्णालयात दाखल केले.

सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहे. सरणावर उडी घेत असताना त्याने कुठलेतरी द्रव्य प्राशन केले असल्याचा पोलिसांचा संशय आहे. वैद्यकीय अहवालानंतरच या सगळ्या बाबीचा खुलासा होणार असल्याची माहिती पुढे येत आहे.

## वटसावित्री पौर्णिमा शहरात मोठ्या उत्साहात साजरी

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** आज बुलढाणा शहरात विविध ठिकाणी वटसावित्री पौर्णिमा पारंपरिक उत्साह आणि श्रद्धेने साजरी करण्यात आली. विवाहित महिलांनी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि अखंड सौभाग्यासाठी वटवृक्षाची पूजा केली. सकाळी लवकरच महिलांनी नटून-थटून मंदिरांमध्ये आणि वटवृक्षांच्या आसपास गर्दी केली होती. शहरातील विविध ठिकाणी आणि सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वटवृक्षांच्या जवळ महिलांनी पारंपरिक वेशभूषा करून, सोळा शृंगार करून पूजा केली. त्यांनी वटवृक्षाला सूत गुंडाळले, हळद-कुंकू वाहिले, फुले अर्पण केली आणि मनोभावे प्रार्थना केली. एकमेकींना वाण देऊन आणि एकमेकींचे आशीर्वाद घेऊन महिलांनी या सणाचे पावित्र्य जपले.

यावेळी अनेक महिलांनी एकत्र जमून सावित्री आणि सत्यवानाच्या कथांचे वाचन केले. ''वटपौर्णिमेमुळे महिलांना एकत्र येऊन आपल्या संस्कृती आणि परंपरेचा अनुभव घेता येतो. पतीच्या दीर्घायुष्यासाठी केलेली प्रार्थना मनाला शांती देते,'' असे एका गृहिणीने सांगितले. शहरातील विविध भागात स्थानिक संस्थांनी वटपौर्णिमेनिमित्त विशेष पूजा आणि कार्यक्रमांचे आयोजन केले होते. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी काही ठिकाणी महिलांनी वटवृक्षांची लागवड देखील केली. एकंदरीत, शहरात वटसावित्री पौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात साजरी झाली, ज्यामुळे पारंपरिक मूल्यांचे जतन आणि सामाजिक एकोपा अधिक दृढ झाला.